# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

शैक्षणिक विभाग

परिपत्रक क्र. 271/२०२१

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न व स्वायत्त महाविद्यालये/मान्यता प्राप्त परिसंस्थांमधील अध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांचेकडून सेवा विषयक बाबीं व इतर संदर्भात विद्यापीठाकडे तक्रारी प्राप्त होतात. या तक्रारी साधारणतः वेतन न मिळणे, वेतन कमी मिळणे, सेवापुस्तक, वेतन चिठ्ठी न मिळणे, वरिष्ठांकडून त्रास, नोकरीतून काढून टाकणे इत्यादी व्यक्तीगत स्वरुपाच्या असतात.

अशा तक्रारी ह्या वारंवार व मोठया प्रमाणात प्राप्त होत असल्याने शैक्षणिक विभागाकडील दैनंदिन कार्यभार सांभाळून प्रत्येक तक्रारदारास वेळीच उत्तर देणे काही वेळेस शक्य होत नाही. परिणामतः संबंधित तक्रारदाराकडून माहिती अधिकार अधिनियमांतर्गत तक्रारीवरील कार्यवाहीची माहिती मागविण्यात येते व अर्जांची व त्यावरील अपिलांची संख्या वाढते.

शिक्षकेतर पदांकरिता महाराष्ट्र अकृषि विद्यापीठे आणि संलग्नित महाविद्यालये प्रामणसंहिता (शिक्षकेतर पदांच्या अटी व सेवाशर्ती) नियम, १९८४ मधील तरतूदी दिनांक ०१ मे, १९८५ पासून लागू करण्यात आलेल्या आहेत. सदर नियमांमध्ये शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे कर्तव्य व जाबाबदाऱ्या नमूद करण्यात आलेल्या आहेत. महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाने शासन निर्णय क्र. संकीर्ण–२०१०/(३१२/२०१०)/विशि–१, दिनांक २० मे, २०१० नुसार अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकेतर अधिकारी/कर्मचारी यांचेसाठी सध्या अस्तित्वात असलेली महाराष्ट्र अकृषि विद्यापीठे आणि संलग्नित महाविद्यालये प्रमाणसंहिता (शिक्षकेतर पदांच्या अटी व सेवाशर्ती) नियम, १९८४ रद्द करण्यात आलेला असून त्याऐवजी सामाईक परिनियम (Common Statutes) लागू होईपर्यंत महाराष्ट्र नागरी सेवा नियमातील तरतूदी लागू करण्यात आलेल्या आहेत.

शासन स्तरावर प्रमाणसंहिता तयार करण्याची कार्यवाही सुरू असल्यामुळे अद्यापपर्यंत विद्यापीठस्तरावर सदर पदांच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या स्वतंत्रपणे तयार करण्यात आलेल्या नाहीत. सद्यस्थितीमध्ये विभागातील कामकाज हे विभागप्रमुखांच्या सूचनेप्रमाणे करणे आवश्यक आहे.

त्यामुळे संलग्न व स्वायत्त महाविद्यालये/मान्यता प्राप्त परिसंस्थातील अध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे आणि त्यांचे संबंधित व्यवस्थापन यांच्यामधील विवादांच्या अभिनिर्णयासाठी अथवा सेवासंबंधीची गाऱ्हाणी किंवा तक्रारी यांचे निवारणासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मध्ये तरतूद करण्यात आली असून तक्रारीचे स्वरूप आणि दाद मागणीसाठीचा मंच याची माहिती खालील तक्त्यात देण्यात आलेली आहे.

या परिपत्रकान्वये विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये/मान्यता प्राप्त परिसंस्थातील अध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कळविण्यात येते की, खालील तक्तांमध्ये नमूद केल्याप्रमाणे त्यांच्या तक्रारी बाबत संबंधित प्राधिकरणाकडे दाद मागावी/तक्रार करावी.

(कृ.मागे पहा)

| अ. क्र. | तक्रारीचे स्वरुप | दाद मागण्यासाठीचे प्राधिकरण |
|---|---|---|
| १. | विद्यापीठाशी संलग्न व स्वायत्त महाविद्यालयांचे आणि मान्यता प्राप्त संस्थांचे अध्यापक व इतर कर्मचारी आणि संबंधित व्यवस्थापन यांच्या मधील विवादांच्या अभिनिर्णयासाठी (व्यवस्थापनाने बडतर्फ केले असेल किंवा पदावरून काढून टाकले असेल किंवा अन्यथा सेवा समाप्त केली असेल किंवा सक्तीने सेवानिवृत्त केले असेल किंवा पदावनत केले असेल) अशा विवादांच्या अभिनिर्णयासाठी तसेच तक्रार निवारण समितीच्या निर्णयाने व्यथित झाला असेल याकरिता. | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम, ८० नुसार विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण. |
| २. | विद्यापीठाशी संलग्न व स्वायत्त महाविद्यालयांचे आणि मान्यता प्राप्त संस्थांचे अध्यापक व इतर कर्मचारी यांच्या राज्य शासन व त्यांचे अधिकारी यांच्या विरूध्दच्या तक्रारी व्यतिरिक्त इतर सर्व प्रकारच्या तक्रारी. (व्यवस्थापनाने बडतर्फ केले असेल किंवा पदावरून काढून टाकले असेल किंवा अन्यथा सेवा समाप्त केली असेल किंवा सक्तीने सेवा निवृत्त केले असेल किंवा पदावनत केले असेल या खेरीज करून इतर सर्व तक्रारी) | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम, ७९ नुसार घठित केलेली तक्रार निवारण समिती. |

तरी सर्व संबंधितांनी वरील तरतूदीची नोंद घेऊन त्याप्रमाणे संबंधित मंचाकडे त्यांची तक्रार सादर करावी

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७ )
जा. क्र. सीसीओ/ 1933 )
दि. 21 सप्टेंबर, २०२१ )

(डॉ. प्रफुल्ल पवार)
कुलसचिव

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :**

मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यता प्राप्त परिसंस्था,
पुणे, अहमदनगर व नाशिक

आपणास निर्देशित करण्यात येते की, परिपत्रकातील तक्ता जसाच्या तसा सूचना फलक स्वरुपात करून महाविद्यालय/ परिसंस्थेत दर्शनी भागात लावण्यात यावा. तसेच महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावा.